# सेवक वार्ता

दीपावली शुभचिंतन

ऑक्टोबर-२०२४

वर्ष -५ अंक- १२

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


दिपावलीच्या सेवकचे सर्व सदस्य व चाहते, वाचक, मदतनीस, समर्थक, हितचिंतक, त्यांचे कुटुंबिय या सर्वांना हार्दिक शुभेच्छा




**सेवक संघाची वाटचाल ..............**

**नवीन आव्हाने**

**सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे आणि मग्रारोहयो वनीकरण कामांचे मुल्यांकन**

सामाजिक वनीकरण विभागाकडून सेवक संघास, विश्वासाने, रोपवाटिकांचे आणि मग्रारोहयो वनीकरण कामांचे मुल्यांकन करणेस दस-यानंतर सुरूवात होउन काम पूर्णत्वास आले आहे.

या कामासाठी जोमाने सुरुवात श्री विठ्ठल पत्की, सर सेवक समन्वयक म्हणून व श्री. संजय जगताप यांनी चमू प्रमुखाची जबाबदारी पार पाडत आहेत.

दिनांक ३.१०.२४ रोजी रोपवाटिका मूल्यांकन समझोता अभिलेख नोंदविण्यात आला. होता. त्यानुसार पुढील ६० दिवसाच्या आंत अंतिम अहवाल देणे आहे. या करिता मूल्यांकन कामे ३१ ऑक्टोबर पर्यंत करणे आवश्यक होते. त्यासाठी रविवार दिनांक ५ .१०. २४ रोजी सायंकाळी ४ वाजता google meet आयोजित करण्यात आली होती. त्यास बहुतांश सदस्यांनी हजेरी लावली. सर्व सदस्यांना सूचना, गूगल फॉर्म, मूल्यांकन प्रपत्र देण्यात आलेत. त्यावेळी त्या अनुषंगाने काही शंकाचे निरसनदेखील करणेत आले होते.

**रोपवाटिका मूल्यांकन - 2024 कामाबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या होत्या.**

1. रोपवाटिका मूल्यांकन दिनांक 31 ऑक्टोबर 2024 पर्यंत पूर्ण करावे.
2. काही अपरीहार्य परिस्थिति मध्ये एखादा सदस्य उपस्थित होऊ शकत नसल्यास एकट्याने मूल्यांकन करू नये. त्यावेळी इतर स्थानिक उपलब्ध सेवक सदस्य घेवून मूल्यांकन पूर्ण करावे.
3. सर्व संबंधित DFO यांची यादी व फोन क्र. वर चमू प्रमुखाने DFO सोबत संपर्क साधून मूल्यांकनाची तारीख निश्चित करून घ्यावी. निश्चित तारीख मूल्यांकन प्रमुखास कळविण्यात यावी .
4. दोन प्रकारच्या रोपवाटिका (एकीकृत व इतर ) यांचे मूल्यांकन करावयाचे आहे, एकीकृत रोपवाटीकेकरिता अतिरिक्त मुद्दे देण्यात आले आहे . त्यानुसार त्यांचे मूल्यांकन करावयाचे आहे. त्याकरिता प्रपत्रामध्ये तपशील व यादी देण्यात आली आहे.
5. मूल्यांकन माहिती करिता तयार करण्यात आलेल्या प्रपत्रातील संपूर्ण माहिती भरण्यात यावी.त्यातील रकाना मध्ये होय,नाही. संबंधित नाही किंवा निरंक (Yes / No/ Not related किंवा Nil) असे लिहावे.
6. रोपवाटीकेतील प्रत्येक प्रजातीचे नाव ( Botanical Name) देण्यात यावे.
7. प्रजातीवार बियाणे पेरणी च्या कालावधी नुसार रोपांचे वय स्वत: तपासून निश्चित करावे (ही माहिती रोपवाटिका सांभाळणाऱ्या वनमजूर किंवा वनरक्षक कडून विचारून लिहावी.

8. पिशवी भरण्यास वापरलेले (Potting Mixture) बॅग फोडून तपासावे. यात मोठे खडे, वाळूचे प्रमाण व कंपोस्ट, मातीचे कडकपणा,(Hardness) नरम (Softness) व पाण्याचा निचरा तपासून मिश्रणाबाबत अभिप्राय द्यावे.
9. मरळचे प्रमाण एकूण 3000 बॅग करिता वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रजातीकरिता 500 चे एक यूनिट प्रमाणे 6 यूनिट तपासावे. (किमान 6 प्रजाती तपासाव्यात)
10. रोपांचा वाढीचा जोम ( Growth vigour) तपासण्यास निकषानुसार वेगवेगळे रकाने दिले आहेत त्यात माहिती पूर्ण भरावी )
11. मूळे वाकडी होणे ( Root coiling )- पिशवी फोडून मूळे तपासावी ( प्रति प्रजाती एकूण 3 ) . फोडलेली बॅग पुनः रोप लावून भरून घ्यावी.
12. रोपे जमिनीत गेल्यास गट लावतांना (Shifting) चे वेळी सोटमुळ (Tap root ) तुटलेले असण्याची शक्यता असते. ती तपासून अभिप्राय द्यावा.
13. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी सुचनाची झेरॉक्स किंवा मोबाइल वर फोटो काढून प्रत सोबत जोडावी.
14. सर्वसाधारण रोपवाटिका देखरेख,स्वच्छता, रोपांना नावाचे फलक, संख्या दर्शक फलक, रोपनिर्मिती मार्गदर्शिका पुस्तिका / बियाणे उपचार माहिती पत्रक उपलब्धता, गट लागवड व रस्ता दुतर्फा लागवडीसाठी वृक्ष प्रजातींची निवड ईत्यादी बाबत तपशील सुद्धा देण्यात यावा.
15. प्रत्येक रोपवाटीकेतील खालीलप्रमाणे फोटो घेण्यात यावेत.
1. रोपवाटिका फलक सह रोपवाटिका दिसेल असा.( येथे सेवक सदस्य असावेत )
2. रोपांचा जोम तपासत असतांना सेवक सदस्यांचा फोटो. Root coiling चा फोटो
3. माती बेड वर रोपे असल्यास त्याचा / रूट ट्रेनर / पॉलीहाउस, चा फोटो.
4. मूल्यांकनाचे वेळी उपस्थित कर्मचारी व सेवक सदस्य यांचा रोपवाटीकेसह एकत्रित फोटो.
5. फोटो चांगल्या उजेडात व किमान 1200 DP असलेले काढावे. त्यात lat-long,तारीख व रोपवाटीकेचे नाव असणे आवश्यक आहे. फोटो मूल्यांकन करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वतःच्या मोबाईलणे काढावे व त्याची प्रत पाठवावी अन्यथा 2-3 वेळा फोरवर्ड झालेले फोटोची प्रत चांगली येत नाही.
16. काही ठिकाणी निवडलेल्या रोपवाटीकेच्या नावात व स्थळात बदल असल्यास संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून तसे लेखी खुलासा घेवून नंतरच मूल्यांकन करावे. सदर लेखी खुलासा प्रपत्रा सोबत जोडावा.
17. 9 महीने व 18 महीने वयाच्या योजना चे मंजूर अंदाजपत्रकाची प्रत तपासून त्यावरील तांत्रिक व प्रशासकीय क्रमांक व मंजूर निधी प्रपत्रात नमूद करावा. त्यावर झालेला खर्च दर्शवावा. निधी प्रलंबित असल्यास केव्हापासून व किती प्रलंबित आहे ते नमूद करावे. एकीकृत रोपवाटीकेसाठी वेगळयाने निधी देण्यात आला आहे. त्यातील नमूद बाबिवर झालेला खर्च व त्याप्रमाणे केलेली कामे याची प्रत व भौतिक लक्ष तपासून नोंद करावी.
18. Google form व Excel sheet No १७,४१,४४,व ४५ रोपवाटिका निरीक्षणानंतर लगेच पाठवावी.

**ताजा खबर .......**

रोपवाटिका मूल्यांकनात अनेक सदस्य हे नवीन आहेत. श्री जगताप ,चमू प्रमुख यांनी नियोजन करताना एक जुने अनुभवी व एक नवीन सदस्य जोडी तयार करून काम वाटप केले आहे. तरी जुन्या अनुभवी सदस्यांनी नवीन सदस्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करून त्यांचे कडून काम करून घेणेत आले आहे.

**ताजा खबर .......**

वन प्रशिक्षण संस्था, पाल यांचेकडून श्री. संजय जगताप लिखीत व सेवक संघाव्दारे प्रकाशित "वन अपराधांचा तपास, चौकशी, आणि न्यायालयीन प्रक्रिया" या पुस्तकाच्या ५०० प्रतींची मागणी नोंदविण्यात आली आहे.



### वन विकास महामंडळाचे Plantation Inventory Unit कामाकरिता तयारी सुरू

दिनांक 12 /9/2024 रोजी सेवक संघ अमरावती व नागपूर शाखा प्रतिनिधी यांनी श्री. संजीव गौड, व्यव. संचालक वन विकास महामंडळ पदी पदोन्नत झाल्याबद्दल भेट घेवून त्यांचे अभिनंदन केले.

त्यावेळी मा. गौड सरानी वन विकास महामंडळातील Plantation Inventory Unit कामाकरिता Teak plantation मधील Sample Plot मधील survived teak plants enumeration & height /girth measurements सह teak tree status च्या कामाबाबत विचारणा केली आहे. त्यास होकार देउन तयारी सुरू केली आहे. याकरिता श्री. संजय जगताप यांनी मा. पत्की सरांचे सूचनेनुसार PIU FDCM हा व्हॉटस्अप ग्रुप तयार केला आहे. त्यात सेवक सदस्याना सामावून घेतले आहे.

### सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा

दि. १९-९-२०२४ रोजी पुणे येथे सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखड्यावर बैठक झाली. बैठकीला रेल्वे, सेवक संघ, वन्यजीव व दोन प्रादेशिक वन विभाग, वन अकादमी प्रतिनिधी,असे एकूण १२ जण उपस्थित होते. या कामाचा समझोता अभिलेख वन अकादमी व सेवक संघ यांच्यात रु. ९.४४ लक्ष कामाचे शुल्कासाठी स्वाक्षरीत झाला आहे. ही रक्कम ४ हप्त्यात देय आहे. आराखडा तयार करण्याची ९० दिवसाची मुदत आहे.

## 🌻 नवी आव्हाने

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम... प्रगतीचा आढावा

वनरक्षकाचे पायाभूत प्रशिक्षणाकरीता वाचन साहित्यात /अभ्यासक्रमातील सर्व बाबी समाविष्ट आहेत किंवा नाही/ तपासणी करणा-या समिती सदस्य व लेखक यांनी करून वाचन साहित्य अंतिम करण्याची कारवाई आता अखेर पूर्ण केली आहे.

पटलं तर....

## कर्म सिध्दान्त वगैरे........

"आयुष्यभर मजबूत पैसे खाऊन, अतोनात भ्रष्टाचार करुनही माणसं सुखासमाधानाने आणि मजेत रहातात त्यामुळे कर्म सिध्दान्त वगैरे सगळं झूट आहे" असा अनेकांच्या विचारांचा ट्रेन्ड सध्या दिसून येतो. मी अजिबात जजमेंटल नाही पण माझा अशा कितीतरी लोकांशी संपर्क आणि संवाद असल्याने मी याची एक्झॅक्टली दुसरी बाजू सांगतो. पटली तर घ्या नाहीतर सोडून द्या....

माझ्या परिचयातील असेच एक गृहस्थ... आयुष्यभर फक्त अतोनात भ्रष्टाचार केला. जिथे जिथे शक्य आहे तिथे तिथे पैसे खाल्ले. रिटायरमेंटपर्यंत एकही इनक्वायरी नाही की कसली चौकशीही नाही. खाल्लेला पै न पै नीट पचवून, इन्वेस्ट्मेंट करुन आणि पुढच्या दोन पिढ्यांची व्यवस्था करुन पेन्शनीत मस्त आयुष्य जगत होते. कसलीही ददात नाही की काही नाही....वरवर पाहता अतिशय सुखी आणि उत्तम आयुष्य. रोज स्कॉच आणि सिगारेटी वगैरे असूनही तब्येत धडधाकट. सहा परदेशप्रवास, आलिशान कार, मुलाचा बिझनेस...मज्जानू लाईफ.

एकदा अपॉइंटमेंट घेऊन माझ्याकडे आले. पत्रिका दाखवायला... बसले आणि इकडचं तिकडचं बोलून थेट रडायलाच लागले. मला समजेचना...मग विषयाला हात घातला. ते त्यानंतर जे काही म्हणाले ते मला तरी खूप आंतर्मुख करुन गेलं...

"सचिन, वरवर बघता मी म्हणेन माझ्याइतका सुखी माणूस कोणी नाही. वारेमाप पैसा, तीन फ्लॅट्स, गावाकडे बंगला, पैसा अडका सगळं काही आहे. पण तुला सांगू? माझं मन आता गेले काही दिवस मला अतिशय खात आहे. मी कोणालाही सांगू शकत नाही, बायकोलाही सांगितले नाही... अरे, आता मला रोज आयुष्य जगताना, बँक बॅलन्स बघताना, बायकोचे दागिने बघताना, मी आयुष्यभर ज्यांना ज्यांना लुटलं, ज्यांच्याकडून पैसे खाल्ले त्यांचे चेहरे उभे रहातायत. म्हणजे मी जेव्हा अगदी ज्युनियर असल्यापासून एका खेड्यातल्या गरीब बाईकडून साहेबांच्या सहीला पन्नास रुपये लागतील असं बोलून जिच्याकडून पैसे खाल्ले त्या बाईचा चेहराही उभा रहातो. मी जिथून जिथून पैसे खाल्ले, लोकांची अडवणूक केली आणि पैसा दिला नाही म्हणून कामं केली नाही ते सगळे मला दिसतात... माझा कॉन्शस मला खायला लागला आहे. मी झोपलो तरी मला आता मन शांत बसू देत नाही.... एका बाईने मला लाच म्हणून हजार रुपये दिले नाही. मी तिचं काम केले नाही ती बाई दिवसभर आमच्या ऑफिसबाहेर झाडाखाली हतबलपणे बसून होती ते आठवतं, तेव्हा काही वाटलं नव्हतं पण आता मला कमालीची बेचैनी येते. तिचा हतबल म्लान चेहरा आठवतो. अत्यंत लबाडीने आणि साळसूदपणे लोकांना लुबाडून केलेल्या खरेद्या आठवतात. गोरगरिबांना लुटून मी युरोपवारी केली त्याचा गिल्ट मला आतून कुरतडतो आहे...

सगळं मजेत चाललंय असं तुम्हाला जगाला दिसतंय ते तसंच दिसत रहाणार याची काळजी मी घेतोच आहे. पण परवा मुलगा माझ्या सुनेसमोर मला म्हणाला,पपा तुम्ही गप बसा हो. तुम्हाला काय कळतंय? माझा कचरा झाला तिच्यासमोर. पण पुन्हा हसरा रिलॅक्स मुखवटा घेऊन मी वॉकला बाहेर पडलो रे...
वाळ्या कोळ्यासारखी गत झाली आहे माझी. माझं आंतर्मन मला सांगतंय... आत्ता आनंदी मुखवटा घालून मी हसत खिदळत फिरतोय पण आतून पोखरत चाललो आहे मनाने. मला अन्नपाणी गोड लागत नाही. मी अबोल होत चाललो आहे. हरिद्वारला जाऊन गंगास्नान पण करुन आलो.... काय जे मनात येईल ते करतो. अन्नदान करतो, होमहवन करतो पण मला आतून माहित आहे... हे डाग निघणार नाहीत. मी आतल्या आत कोंडून मरणार आहे सचिन...."

मी पत्रिकेवर नजर टाकली. शनि महादशा सुरु होऊन जेमतेम सहा महिनेच झाले होते. शनि महाराजांचा अंमल सुरु झाल्यावर देवांचे देव महादेवही जिथे वरमले आणि हत्तीचं रुप घेऊन जंगलात लपले तिथे असल्या छाटछूट रावसाहेब आणि तात्यालोकांची काय अवस्था होणार? आजही ते गृहस्थ दिसतात... नजरेतला भकासपणा आणि एकटेपणा आताशा जास्त गडद होत चालला आहे...
बाकी सगळं छान सुरु आहे !!!

-सचिन मधुकर परांजपे (पालघर)

## अडीच अक्षरे......

अडीच अक्षरांचा कृष्ण
अडीच अक्षरांची लक्ष्मी
अडीच अक्षरांची श्रद्धा
अडीच अक्षरांची शक्ती!
अडीच अक्षरांची कान्ता
अडीच अक्षरांची दुर्गा
अडीच अक्षरांची ईच्छा
नी अडीच अक्षरांचा योध्दा!
जन्मापासुन मृत्युपर्यंत
अडीच अक्षरांत बांधलेले
आयुष्य हे मानवाचे
नाही कुणा उमगले!!

### नवीन आजीवन सदस्य

* सेवक संघ चंद्रपूर शाखेत.
1..श्री व्हि.बी.कामडी. सेनि. वनक्षेत्रपाल,से.नि.
2.. श्री पि.डी.भोये, सेनि. वनक्षेत्रपाल
*सेवक संघ नागपूर शाखेत.
३. श्री पांडुरंग कामडी सेवानिवृत्त वनपाल
*सेवक संघ धळे शाखेत
४ श्री. विद्र रामराव कुलकर्णी, सेवानिवृत्त सवसं
५. श्री अशोक परसराम खैरनार सेवानिवृत्त वनक्षेत्रपाल
त्यांचे सेवक संघ परिवारात हार्दिक स्वागत आहे.

### वाचक प्रतिक्रिया

**First rate as usual !** ... VB Sawarkar

**Excellent ! ... MM Kuilkari**

******************************************


### मानसिक आरोग्याबाबत समस्यांचे मोफत निराकरण

श्री बबनराव दगडूजी वाघ, B.Sc. LLb, सेनि. विवअ रा.नाशिक व सध्या अध्यक्ष, सेवक संघ, नाशिक शाखा हे कळवितात की, " मी आणि माझी पत्नी सौ. सुशिला दोघेही यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व प्रजापिता ब्रम्हकुमारीज्, नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या "Advance Diploma in Councelling and Mental Health" या विषयांत प्रथम श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले आहेत. वन कर्मचारी, सेवक संघाचे सदस्य आणि कुटुंबीय यांचे मानसिक आरोग्याबाबत असणाऱ्या समस्यांचे निराकरण मोफत करण्यात येईल. तथापि, आगाऊ अपॉईंटमेंट घेणे आवश्यक आहे.

कृपया या संधीचा लाभ घेण्यात यावा ही विनंती."

संपर्क - श्री. बबन वाघ, (M) 9423691757, 9373900825

## निधन वार्ता




रतन टाटा, राष्ट्रप्रेमी, देशाच्या विकासाठी अहोरात्र झटणारे, उत्तुंग व्यक्तिमत्त्व, अनमोल रत्न दि. ३-१०-२४ रोजी हरपले. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६